ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# भारतीय बदलत्या कर संरचनेचा अभ्यास

**डॉ. प्रताप फलफले[1], शेख मुस्कान[2]**

*संगमनेर नगरपालिका आर्ट. डी. जे. मालपाणी कॉमर्स. बी. एन. सारडा सायन्स कॉलेज संगमनेर*

*Corresponding Author: डॉ. प्रताप फलफले*

**DOI - 10.5281/zenodo.15093296**

**प्रस्तावना:**

कर म्हणजे शासनाला सेवा पुरवल्याबद्दल देण्याचा एक मोबदला होय. कराच्या मोबदल्यात शासनाकडून त्या प्रमाणात सेवा किंवा वस्तु मिळतीलच अशी अपेक्षा न ठेवता शासनाला कायदेशीर दृष्ट्या दिली जाणारी रक्कम म्हणजे कर होय. कर हे शासनाचे महत्वाचे उत्पन्नाचे साधन आहे.

भारतातील कर संरचना ही त्रिस्तरीय संधीय संरचना आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक नगरपालिका संस्था ही रचना बनवतात घटनेच्या अनुच्छेद २५६ मध्ये असे म्हंटले आहे की, कायद्याच्या अधिकाराशीवाय कोणताही कर आकारला जाणार नाही किंवा गोळा केला जाणार नाही.

**कराचे प्रकार:**

कराचे प्रमुख दोन प्रकार आहे.

1) प्रत्यक्ष कर
2) अप्रत्यक्ष कर

कराचे वेगवेगळे प्रकार आहेत. वैयक्तिक प्राप्तिकर ( आयकर ) महामंडळकर , भांडवली नफाकर भांडवलावरील आणि मालमत्तेवरील कर , खर्चावरील कर वस्तूवरील कर उत्पादनावरील कर. आयातीवरील व निर्याती वरील कर विक्रीकर इ. करवसुलीसाठी शासनाकडे यंत्रणा असते. करविषयक सल्लागारही असतात.

केंद्र सरकार उत्पन्नावर कर आकारते सीमा शुल्क केंद्रीय उत्पादन शुल्क आणि सेवा कर. मूल्य वर्धित कर (vat) मुद्रांक शुल्क राज्य उत्पादन शुल्क जमीन महसूल आणि व्यवसायावरील कर राज्य सरकारे लावतात.

१ जुलै २०१७ पासून एक देश एक कर प्रणाली सुरू करण्यात आली. कोणताही नवीन कर प्रारंभी फक्त काही ठरावीक लोकांच्या ठराविक उत्पन्नावर लावला जातो. व नंतर हळू हळू त्याची व्याप्ती वाढवून सर्व लोकांचे त्या प्रकारचे सर्व उत्पन्न करपात्र काढण्यात येते.

**प्रत्यक्ष कर:**

प्रत्यक्ष कर म्हणजे जो कर सारकारद्वारे थेट व्यक्ति किंवा संस्थेवर त्यांच्या उत्पन्न नफा किंवा मालमत्तेवर आकारला जातो हाकर कोणत्याही तृतीय पक्षाला हस्ताक्षरीत केला जाऊ शकत नाही.

I. व्यक्तीच्या / कंपनीच्या उत्पन्नाद्वारे लागतो.
II. हे एक हस्तातरीत होत नाही
III. ह्याचा करभार श्रीमंतावर असतो
IV. श्रीमंताकडून आकारला जातो व गरीबावर खर्च केला जातो.

या कराची जागा D.T.C घेणार होते पण २०१० ला व्यापगत झाले.

**अप्रत्यक्ष कर:**

सरकारने ज्या व्यक्तीवर कर लादलेला असतो ती व्यक्ति तो कर न भरता तो कर दुसऱ्यावर ढकलण्याचा प्रयत्न करते त्यास

- वस्तु सेवा यांच्या खरेदी व विक्री वर लागणारे कर म्हणजे अप्रत्यक्ष कर.
- यांचा प्रभाव गरीब आणि श्रीमंत दोघांवर सारखाच होतो.
- अप्रत्यक्ष कराची जागा १ जुलै २०१७ पासून GST ने घेतली.




**भारतातील कर संरचनेचे महत्व:**

केंद्र सरकार आणि राज्य सरकार प्रत्येकी भारताच्या कर प्रणाली अंतर्गत त्यांचे स्वताचे कर आकारातात. स्थानिक सरकार जसे की नगरपालिका आणि स्थानिक सरकार काही लहान लेव्हीज लागू करतात.

भारतातील कर रचना देशाच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावते ही रचना सरकारला आवश्यक उत्पन्न पुरवते. जे सार्वजनिक कल्याणकारी योजनांचा, पायाभूत सुविधाना आणि देशाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या इतर उपक्रमाना निधी पुरवते.

सरकारला उत्पन्न पुरवणे, करांमधून मिळालेले उत्पन्न सरकारला शिक्षण, आरोग्य, रस्ते, पूल, इत्यादि. सार्वजनिक सेवांच्या विकासासाठी वापरता येते. आर्थिक विषमता कमी करणे. उच्च उत्पन्न गटावर कमी कर लादुन सरकार आर्थिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न करते. उत्पादन आणि रोजगार वाढणे कर प्रोत्साहन देऊन सरकार उत्पादन आणि रोजगार वाढण्याचा प्रयत्न करते कर रचना देशाची आर्थिक स्थिरता राखण्यात महत्वपूर्ण भूमिका बाजवते.

करांमुळे सरकारला सार्वजनिक कल्याणकारी योजना राबवता येते. करांमुळे देशाचा विकास होतो करांमुळे रोजगार निर्माण होतात करांमुळे सामाजिक न्याय स्थापित होण्यास मदत होते.

**भारताची बदलती कर व्यवस्था:**

अर्थव्यवस्था वाढत असताना कर रचनेत बदल करून सरकार आधिक उत्पन्न मिळवू शकते सरकारच्या नवीन धोरणानुसार कर रचनेत बदल करून विशिष्ट क्षेत्रना प्रोत्साहन किंवा अंकुश लावता येतो. जागतिक स्तरावर होणाऱ्या बदलानुसार भारतालाही आपली कर रचना बदलणे आवश्यक असते तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे कर आकारणी प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि प्रभावी बनली आहे.

**या बदलांचे मुख्य उद्देश:**

1) सरलीकरण – कर प्रणाली अधिक सोपी आणि समजण्यास सुलभ करणे.
2) दिव्यांग – कर चोरी कमी करणे आणि कर अनुपालन वाढवणे.
3) आर्थिक विकास – देशाच्या आर्थिक विकासाला चालना देणे.

**मुख्य बदल:**

1) वस्तु सेवा कर ( GST ) – भारतातील सर्वात मोठा कर सुधार म्हणजे GST ची अमलबजावणी याने देशभरात अनेक अप्रत्यक्ष कराचे एकत्रीकरण केले जाते.
2) प्रत्यक्ष कर सुधार – आयकर कायद्यात अनेक बदल करून कर संरचनेला अधिक प्रगतिशील बनवन्याचा प्रयत्न केला जात आहे.
3) डिजिटल पेमेंट – डिजिटल पेमेंट ला प्रोत्साहन देण्यासाठी कर सवलती देण्यात येत आहेत.

4) कर दारांमध्ये बदल – वेळो वेळी कर दारांमध्ये बदल करून कर संरचनेला समयोजित केले जाते.

**बदलांचा परिणाम:**

1) उद्योगांवर प्रभाव – GST मुळे उद्योगांचा उत्पादन खर्च कमी आहे आणि लोजिस्टिक्स सुलभ झाले आहे.
2) करदात्यावर प्रभाव – करदात्यांना एकाच ठिकाणी कर भरता येत आहे आणि कर प्रक्रिया सोपी झाली आहे.
3) सरकारच्या उत्पन्नावर प्रभाव – GST मुळे सरकारचे उत्पन्न वाढले आहे.

**GST लागू झाल्यापासून ( १ जुलै २०१७ पासून ) महसुलात झालेले बदल:**

जुलै २०१७ मध्ये भारतीय संसदेने देशभरातील जीएसटी अंमलबजावणीसाठी पुढे सुरू ठेवण्यासाठी अधिकाऱ्याना अंतिम विश्वास दिला जीएसटी मध्ये दुहेरी संरचना आहे. ज्यानुसार वस्तु आणि सेवांच्या पुरवठ्यावर कर आकारण्याची क्षमता केंद्र आणि राज्ये दिली गेली आहेत केंद्र केंद्रीय जीएसटी आणि एकीकृत जीएसटी आंकारू शकते आणि प्रशासित करू शकते तर राज्ये किंवा केंद्राशासित प्रदेशांमध्ये अनुक्रमे राज्ये – जीएसटी किंवा केंद्रशासित प्रदेश जीएसटी आकरण्याचा अधिकार आहे.

GST हा सर्व सेवा आणि वस्तुसाठी लागू असलेला एकल, सर्वसमावेशक कर आहे. भारतीय कर दात्यासाठी वर्तमान जीएसटी स्लॅब ०% , ५ % , १२ % , १८ % , आणि २८% आहेत, त्यापैकी जे वेगवेगळ्या श्रेणीतील वस्तु आणि सेवांची वैशिष्टे आहेत प्रसंगीकपणे वापरलेले GST दर जसे ३% आणि ०.२५% या व्यतिरिक्त संमिश्र करपात्र नागरिकांसाठी GST दर त्यांच्या उलाढालीसापेक्ष १.५% , ५% किंवा ६% आहेत.

**GST लागू झाल्यापासून सरकारच्या महसुलात झालेला बदल:**

1) GST लागू झाल्यापासून सरकारचा एकूण महसूल वाढला आहे.
2) GST मुळे कर आकारणी प्रक्रिया सोपी झाली आहे
3) GST मुळे कर चोरी कमी झाली आहे
4) GST मुळे देशातील अर्थव्यवस्था अधिक गतिमान झाली आहे
5) GST मुळे कागदपत्रांची आवशक्यता कमी झाली आहे

**भविष्यातील दिशा:**

1) सरकारच्या मते कर दरांमध्ये भविष्यात आणखी घट होण्याची शक्यता आहे
2) डिजिटल कर संरचना – कर प्रणाली पूर्णपणे डिजिटल बनवन्याचा प्रयत्न केला जाईल
3) भारताची कर संरचना आंतरराष्ट्रीय कर मानकांशी अधिक सुसंगत होईल

**सारांश:**

भारतातील कर रचना सतत बदलत असून या बदलांचा थेट परिणाम नागरिकांच्या आर्थिक जीवनावर होतो या शोधनिबंधात आपण भारतातील कर रचनेतील प्रमुख बदल आणि त्यांचे परिणाम यांचा सखोल अभ्यास केला आहे.

**संदर्भसुची:**

1. https://www.5paisa.com/marathi/stock-market-guide/tax/advantages-and-disadvantages-of-gst